**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४२/२०१९</u>**
(शेख कासम अब्दुल करीम विरुध्द शेख इक्बाल अब्दुल करीम व. १७)

## :– नि. ३४ खालील आदेश –:

अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी सदरचा अर्ज या दाव्यातील प्र.वादी नं. ९ फातिमा उस्मान शेख या दिनांक १७/०८/२०२० रोजी मयत झालेली असून तिचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांचे अर्जातील कथन की, प्रतिवादी क्र. ०९ चे वारस दाव्यात यापूर्वीच मुदतीत दाखल करणे आवश्यक होते, परंतू, संपुर्ण भारत देशात कोवीड–१९ची महामारी उद्भवली व त्यामुळे देशात टाळेबंदी घोषित केली. त्यामुळे प्रतिवादी क्र. ९ या दिनांक १७/०८/२०२० रोजी मयत झाल्या असल्या तरी त्यांचे वारसांची नावे मुदतीत दाखल करु शकले नाही. परंतु, सदर कालावधीत झालेल्या विलंबाबाबत, ना. सर्वोच्च न्यायालय यांनी एसओपी प्रमाणे दिनांक १५/०३/२०२० रोजी ते २८/०२/२०२२ च्या कालावधीत एकाद्या प्रकरणाबाबत मुदत संपत असेल तर अशा प्रकरणांना ९० दिवसांचे संरक्षण दिलेले होते. सबब, प्रतिवादी क्र. ९ हिचे वारस अभिलेखावर दाखल करुन घेण्यास झालेला विलंब माफ होवून अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती वादी तर्फे करण्यात आली आहे.

०३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन सदरील अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. मुदतीचा कायदा आर्टीकल १२० नुसार दाव्यातील एखादा पक्षकार मयत झाल्यास मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत मयत पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक असते. त्याचबरोबर अशा मयत पक्षकाराबाबत दावा उपशमित झाल्यास आर्टीकल १२१ नुसार ६० दिवसांच्या आत तो आदेश रद्द करुन घेणे आवश्यक आहे.

**०५.** प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं. ९ फातिमा उस्मान शेख या दिनांक १७/०८/२०२० रोजी मयत झाल्या आहेत. त्यामुळे मृत्यू तारखेपासून पुढे ९० दिवसांचे आत त्यांचे वारसाबाबत दाव्यामध्ये तजवीज करणे आवश्यक होते. परंतु वारस दाखल करण्यास त्यांना विलंब झालेला आहे. प्रस्तुतचा दावा, सरस निरस धडेवाटप व पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादी नं. ९ चे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. सबब, सदरचा विलंब माफ करणेकरीता ३४ कडील अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. परंतु, वादी यांनी सदरचा अर्ज अतिशय विलंबाने दिलेला असल्यामुळे न्यायालयाचा व प्रतिवादीचा बहुमुल्य वेळ वाया गेल्याने वादी यांचेवर योग्य तो खर्च लावणे आवश्यक आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि. ३४ कडील अर्ज वादी यांनी प्रतिवादीस रक्कम रुपये ३००/– (रुपये तीनशे मात्र) इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर मयत प्रतिवादी नं. ०९ यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

सही/–
(प.रा.ढोरे )
सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.

दिनांक– २१/०२/२०२४